सं.फौ.ख.क्र. ३९०/२०२५
शासन..वि.. अलका
**निशाणी क्र.८ खाली**

MHWS090005932025

## न्या य नि र्ण य

(अधिघोषीत दिनांक २४ जुन, २०२६)

आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९–कलम ६५ (ई) अन्वये अपराधाच्या आरोपासाठी सदरचा खटला भरण्यात आला आहे.

२. अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला आणि आरोपीतर्फे विद्वान वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

३. आरोपी विरुध्द ठेवण्यात आलेला आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने केवळ एक साक्षीदाराला तपासले. अभिलेखावर आरोपी विरुध्द पुरावा आला नसल्यामुळे भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ३५१ अन्वये बयान नोंदविण्यात आले नाही.

४. वरील प्रकरणाचा विचार करता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उद्भवतात व त्यावरील निष्कर्श कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदविले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्श |
|---|---|---|
| १. | दिनांक १९.०३.२०२५ रोजी १०:०० वाजण्याचे सुमारास ग्राम–हातोली, ता. मानोरा जि.वाशिम येथे आरोपी तिचे ताब्यात २५ लिटर गावठी हातभट्टीची दारु व ३०० लिटर सडवा मोहमाच विनापरवाना बेकायदेशिर रित्या बाळगतांना मिळून आल्याचे अभियोगपक्ष सिद्ध करतो काय ? | ....नकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## – कारणमिमांसा –

<u>मुद्दा क्र.१ व २ करीता :</u>

५. सदर प्रकरणामध्ये आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने केवळ एक साक्षीदाराला तपासले. हरीदास किसन राठोड (साक्षीदार क्र.१) हे घटनास्थळ जप्तीपंच साक्षीदार असून सदर साक्षीदाराने त्याचे पूराव्यात अभियोग पक्षाला सहकार्य केले नाही. त्यामुळे सरकारी वकीलांनी साक्षीदाराला उलट तपासणीच्या स्वरूपात प्रश्न विचारले, परंतु, अभियोगपक्षाला उपयोगात येईल असा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

६. अभियोगपक्षाला पुरेशी संधी देवूनही अभियोगपक्ष प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आणि तपासी अधिकारी यांचा पूरावा नोंदवू शकला नाही. याप्रकरणात अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेला पंच साक्षीदाराचा पुरावा उपयोगाचा नाही, म्हणून दारू पंचांच्या समक्ष आरोपीकडून जप्त करण्यात आली होती ही बाब सिध्द होत नाही. तसेच रासायनिक पृथक्करणाचा अहवाल सिध्द न झाल्याने या साक्षदाराचा पुरावा अभियोगपक्षास विशेष सहाय्य होत नाही. रासायनिक पृथक्करणाच्या अहवाला अभावी अन्य साक्षीदारांना तपासण्याचा देखील अभियोपक्षास उपयोग होणार नाही. त्यामुळे रासायनिक पृथक्करणाच्या अहवाला अभावी अभियोगपक्षास आरोपी विरूध्द दोषारोप सिध्द करता येत नाही. करीता मुद्दा क्र.१ चे उत्तर 'नकारार्थी' देवून मुद्दा क्र.२ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. आरोपी नामे **अलका दिलीप आडे**, रा.ग्राम–हातोली, ता. मानोरा, जि.वाशिम यांची महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २७८(१) नुसार दोषमुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

**निशाणी क्र.८ खाली**

३. जप्त मुद्देमाल अपिलीय कालावधीनंतर नाश करण्यात यावा.

४. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ च्या पुर्ततेसाठी रक्कम रू.१५,०००/– चा वैयक्तीक जात मुचलका व जामीन कदबा द्यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by JAGDISH TULSIDAS KOREGAONKAR
Date: 2026.06.24 13:34:44 +0530

मानोरा
दिनांक : २४.०६.२०२६

( ज. तु. कोरेगांवकर )
न्यायदंडाधिकारी (प्र.श्रे.),
(न्यायालय क्र.१), मानोरा

**निशाणी क्र.८ खाली**

## Certificate

I affirmed that, the contents of this PDF file judgment are same word to word as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Smt. R. K. Chavhan (Grade-III) |
| Court Name | : | (Shri. J. T. Koregaonkar)<br>C.J.J.D. & J.M.F.C., Manora. |
| Judgment signed by P.O. | : | 24/06/2026 |
| Judgment uploaded on | : | 24/06/2026 |